।। श्री सद्‌गुरु प्रसन्न ।।

# पाझर अमृताचा

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

❖ वर्ष ११ वे ❖ अंक १ ला ❖ मार्गशीर्ष - पौष शके १९३६ ❖ १२ डिसें. २०१४ ते २० जाने. २०१५

**प्रकाशक व मुद्रक:**
**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर
{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}
संपर्क : ९८२०५४९४१५
Website - www.shridatt.org

**प्रकाशनस्थळ :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,
डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,
गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**
**सुदर्शन आर्ट प्रिंटिंग प्रेस**
१०, वडाळा उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**

## अंतरंग


| | |
|---|---|
| ◆ भक्तगाथा | ०३ |
| ◆ गुंजारव २ - अविनाश पाठक | ०५ |
| ◆ भागिरथीच्या काठावर... | ०६ |
| ◆ गोजिरवाणी - सौ. नीता कुलकर्णी | ०७ |
| ◆ उत्सव विशेष | ०८ |
| ◆ तरुणाई - रघुनंदन | ०९ |
| ◆ शब्द तेच छेडीता - अदिती | ११ |
| ◆ अहो ऐकलंत का - मुग्धा | १३ |
| ◆ आठवणीतल्या माई - दीपक फडे | १४ |
| ◆ रुचि रुचि भोजन | १७ |
| ◆ गुंजारव १ - सौ. प्रतिभा गोखले | १७ |


***अधिक महिन्यात गुरुभक्तांनी आपल्या कथेची तारीख, वार नक्की करण्यासाठी गु. भ. पुष्पलता मोघे यांच्याशी संपर्क साधावा.***

# संपादकीय... ✍

'पाझर'ची एका दशकातून दुसऱ्याकडे वाटचाल सुरु झाली आहे. ही वाटचाल म्हणजे सर्व साधकांनी हातात हात घालून केलेली वाटचाल! साधक म्हणून आलेले अनुभव, साधना करताना विचार मंथनातून सुचलेले शब्द, गाणी त्या सर्वांना सामावून घेत घेत 'पाझर' पुढे चालला आहे. एकाच दिशेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना एखाद्या गाडीने सामावून घ्यावे ना अगदी तसेच! परंतु ही वाटचाल चालताना सर्व भक्तांच्या प्रतिक्रिया हव्याच! मागील अंकात आम्ही तुमच्या प्रतिक्रिया मागविल्या होत्या. बऱ्याच गुरुभक्तांकडून त्या आल्याही! परंतु काही कारणाने त्या देता आल्या नसतील तर कृपया या अंकासोबत जोडलेला फॉर्म भरून पाठवावा! म्हणजे तुम्हाला नियमित 'पाझर' पाठविता येईल. तसेच पुढील अंकही वेळेत काढता येईल. **प्रतिक्रियांना पोहोचण्यास विलंब होण्यामुळेच हा 'पाझर' काढण्यात उशीर होत आहे.**

महाराजांनी भक्तीचे बीज प्रत्येकाच्या हृदयात पेरलेलेच असते. म्हणूनच तर ही वाटचाल सोपी होते. ते भक्तांना कसे रंगवतात याचे वर्णन 'भक्तगाथेत' आले आहे. त्याचीच उजळणी 'गोजिरवाणी'तही होते. अशी भक्तीच जीवाचे जीवत्व काढून टाकते. ते काढून टाकताना काय घडते याचे वर्णन 'सदाचार' मध्ये आलेले आहे.

वेगवेगळ्या उपक्रमांच्या सहाय्याने महाराज जीवत्व काढीतच असतात. ते काय आणि कसे करतात हे 'शुभमंगल' व 'शब्द तेच छेडिता' वाचताना उमजेल. गुरूमुखातील शब्दांचा प्रतिसाद वेगवेगळ्या साधकांकडून कसा ऐकू येतो हे जाणवते.

काही गुरुभक्तांनी आपल्या आदर्श वागणुकीने इतर गुरुभक्तांच्या हृदयात कसे घर केले आहे हे 'आठवणीतल्या माई' वाचताना जाणवेल.

'तरुणाई' तही 'देहाएवढे मी पण' हेच पारतंत्र्याच्या खाईत लोटते हे समजून येते. खऱ्या अर्थी स्वतंत्र होत ही वाटचाल आपण चालुया,

ही वाट आम्हा नेते सत्यामधील गावा
माझ्या हृदयातला हा भावभावातीत रावा!!

## भक्तगाथा... ✍

बलभीमबोवा साड्यास आल्यानंतर सखाप्पा वाणी, बाळू मारवाडी, नाना पाटील वगैरे मंडळीस फार आनंद झाला. बाळू मारवाडी यांनी पूर्वी कबूल केल्याप्रमाणे बोवा साड्यास आल्याबरोबर सोनोरीचे रा. नानासाहेब पानसे यांस 'बोवा येथे आले आहेत, आपण त्यांच्या भेटीस येथे यावे.' असे पत्र लिहिले. पत्र पोहोचताच नानासाहेब पानसे आपली पत्नी व चिरंजीव विष्णुपंत यांस बरोबर घेऊन साडे गावी आले. तेथे बोवांनी त्या सर्व मंडळींची व्यवस्था उत्तम प्रकारे ठेविली. बोवांची एकंदर वृत्ती पाहून पानसे यांच्या सर्व मंडळींनी बोवांचा अनुग्रह घेतला. साडे मुक्कामी जवळ जवळ एक महिनाभर नानासाहेब पानसे आपल्या मंडळीसह राहिले. त्या सर्वांची बोवांवर इतकी निष्ठा बसली की, गावी परत जावे असे त्यास वाटेना. पुणे प्रांती जेजुरी नजीक सोनोरीस नानासाहेब बोवांस घेऊन गेले. तेथेही कथा कीर्तनाचा खूप थाट झाला. तेथील बरेच लोक बोवांचे अनुयायी झाले. निरनिराळ्या गावांचे लोक कीर्तनास येत असत. त्यामुळे बोवांची कीर्ति गावोगाव पसरली. पुणे येथील ह.भ.प. केशवराव आनंदराव खाजगीवाले यांचे कानावर बोवांची कीर्ति गेली व त्यांनी बोवांस एक पत्र पाठवून पुण्यास येण्याबद्दल आग्रहपूर्वक विनंति केली. खाजगीवाल्यांच्या पत्राप्रमाणे बोवां पुण्यास त्यांचेकडे गेले व नंतर रा. पानसे यांस तेथे बोलावून घेतले. पुण्यास पुष्कळ ठिकाणी बोवांची कीर्तने झाली. बोवांची भगवत्प्रेमी रंगलेली वृत्ति पाहून सर्व श्रोतृगणांस फार आनंद होऊन त्यांचेविषयी आदर उत्पन्न होत असे. या वेळेस रा. बाळासाहेब सोनोरीकर, सुप्याचे आंबीकर, विनायक देव सुपेकर, भागुताई उमरेकर वगैरे बऱ्याच मंडळींनी बोवांचा अनुग्रह घेतला. दुपारी प्रवचन, रात्री व सकाळी भजन, दर गुरुवारी व दर एकादशीस कीर्तन याप्रमाणे बोवांचा क्रम असे. मंडळींचा जमावही बराच होत असे. पुण्यास याप्रमाणे दररोज आनंदाची लूट होत असता देवासहून काशीनाथपंत लेले यांचे व नरसिंगडाहून गणपतराव तांबे व काथवटे यांचे बोवांस तिकडे येण्याबद्दलचे विनंतिपूर्वक पत्र आले व त्याप्रमाणे त्यांनी तेथे जाण्याचे ठरविले. तेथील सर्व मंडळीस पुन्हा लवकर परत येण्याचे आश्वासन देऊन सर्वांचा निरोप घेतला व ते देवाशास गेले.

श्री. काशीनाथपंत लेले यांच्या निमंत्रणावरून बोवा सन १९०७ साली पुणे

सोडून देवाशास आले. या सुमारास सारंगपूरचे रा. शिवरामपंत नारायण लोंढे माजी कमाविसदारसाहेब काही सरकारी कामाकरीता देवाशास आले होते. त्यांचे व काशीनाथपंत लेले यांचे फार जवळचे नाते होते. बोवांची कथा शिवरामपंतांनी या पूर्वी देवाशास ऐकिली होती. त्या वेळेपासूनच त्यांच्या मनात बोवांचा अनुग्रह घ्यावा असे होते, पण योग जुळून आला नाही.

देवास येथे बोवा असताना कृष्णपुऱ्यातील गोविंदभटजींच्या मंदिरात दररोज दुपारी ज्ञानेश्वरी, वाक्यवृत्ति वगैरे ग्रंथांवर बोवा प्रवचन करीत असत. श्रवणास रा. शिवरामपंत लोंढे, रा.ब. कुंटेसाहेब, पेंढारकर वकील, विश्वनाथपंत बापटसाहेब, हरिभाऊ देव विष्णुपंत कयाळ, विनायकराव काजळे वगैरे मंडळी येत असत. बोवांची समजावून सांगण्याची शैली व भगवंती प्रेम पाहून सर्वांस त्यांचेविषयी दिवसेंदिवस अधिकाधिक आदर उत्पन्न होत असे. नंतर काही दिवसांनी वरील सर्व मंडळींनी बोवांचा अनुग्रह घेतला. गावात बऱ्याच ठिकाणी त्यांच्या कथा होत. देवासच्या छोट्या पातीचे श्रीमंत मासाहेब यांच्याही बंगल्यावर कथा झाल्यामुळे बोवांची सर्वत्र प्रसिद्धी झाली. श्री. मासाहेब यांस बोवांचे निस्पृह वर्तन व परमात्म भक्ति पाहून अत्यंत आदर वाटत असे. त्यांनी बोवांस सहकुटुंब देवाशास राहण्याबद्दल विनंति करून त्यांचा सर्व खर्च देण्याचे कबूल केले, पण बोवांनी ती गोष्ट नाकारली. एके दिवशी श्री. मासाहेब यांनी बोवांस एका ताटात काही दागिने, काही रूपये घालून ते ताट बोवांकडे नजराणा म्हणून पाठविले. बोवांनी ते ताट तसेच्या तसेच परत करून निरोप पाठविला की, ‘बोवा एक शुद्ध भगवत्प्रेमावांचून दुसरे काहीही कोणाजवळ मागत नाही व कसली इच्छाही करीत नाही. श्रीगुरु आपले कल्याण करोत व सुबुद्धि देवोत.’ याप्रमाणे निरोप पोहोचताच श्री. मासाहेब यांस बोवांची विरक्ति पाहून आश्चर्य वाटले.

देवास येथे याप्रमाणे मोठ्या आनंदात काळ जात असता एके दिवशी सारंगपुराहून श्री. शिवरामपंत लोंढे यांजकडोन बोवांस सारंगपुरास नेण्याकरिता एक गाडी व दोन माणसे आली व त्यांचे बरोबर बोवा सारंगपुरास जाऊन काही दिवस राहिल्यावर तेथील रा. सदाशिवमास्तर, गंगाधरपंत धनेश्वर, भाऊराव बक्षी, भवानीशंकर जोशी वगैरे बऱ्याच जणांनी बोवांचा उपदेश घेतला. बोवांनी पुष्कळांस बोध करून कथा करण्यास शिकविले व कथा प्रत्यक्ष करवून घेतल्या. सारंगपूर येथील भोपजीच्या मंदिरात गोकुळाष्टमीचा उत्सव होता. तेथे बोवांनी कथा करून तो उत्सव उत्तम

रितीने तडीस नेला. उत्सवात बोवांच्या कथेशिवाय त्यांचे चिरंजीव दत्त महाराज, शिवरापंत लोंढे वगैरे इसमांच्या कथा झाल्या. उत्सव सुरु असता एके दिवशी बोवांनी आपल्या पत्नीसही कथा करण्यास सांगून त्याजकडून कथा करविली; सर्वास फारच आनंद झाला. सारंगपूरच्या मंडळीचे बोवांवर इतके प्रेम जडले की, रात्रंदिवस बोवांच्या सन्निध राहून ते परमार्थ चर्चा बराच वेळपर्यंत करीत असत. बोवांच्या दररोजच्या नियमामुळे घरोघर भजनाचा उपक्रम सुरू झाला. 'गोपाळ राधे कृष्ण गोविंद गोविंद' व 'गुरु महाराज गुरु जय जय परब्रह्म सद्‌गुरू।' वगैरे भजनाचा घोष सारंगपुरातील आबालवृद्ध करीत असत. त्यामुळे त्या गावचे सर्व लोक केवळ आनंदरूप झाले होते. 'आंनदाचे आवारूं मांडूं जगा।' या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनाप्रमाणे बोवांनी सर्व सारंगपुर श्रीरंगचरणी रंगविले. ■■■

## गुंजारव - २

**- अविनाश पाठक**

धन्य धन्य गुरुनाथा। तुझ्या चरणी ठेविला माथा।।१।।
पाहोनिया स्थिता। लाजवी शिष्योत्तमा।।२।।
भेदाभेद मावळला सर्वेश्वराचा। करूनी ठेला स्वानुभवाचा।।३।।
कैचा आता भयभ्रम। अभय पक्ष स्थित कायम।।४।।
आनंद उपभोगी सहज अकळ। उरला तुझा तुचि सकळ।।५।।
तरी न रहावे त्या स्थितीत। सगुण रूप तुझे खुणावित।।६।।
धरावे उचलावे प्रेमे हाता। हाच खेळ दोन्ही कडे।।७।।
गुरुशिष्या नागवले। असीम उरे दोन्ही कडे।।८।।
निश्चळ, परिपूर्ण, सुखवत। आपला आपण आनंद घेत।।९।।
सर्व द्वैत खंडून अखंडत्व। अभेद बोध पारंपारिक।।१०।।
बाणवी अच्युता न ढळ। तुझा ठाव अपरंपार केवळ।।११।।
स्वानुभवी अंतर्बाह्य। अविनाशी माधुरी कृपा दत्त।।१२।।
भागिरथी गंगा लक्ष मन। बुद्धी पावन बलभीम।।१३।।
झाला नरनारायण। दत्त दत्त अत्री राहे ब्रह्म।।१४।।
हंस स्फुरण लाट उद्‌भव। लय पावे स्वनिज दिप्ती।।१५।।

# भागिरथीच्या काठावर बसले असताना अंगावर उडालेले ज्ञानतुषार... ✍

## सदाचार

३२) प्रमाता प्रमेय प्रमाण। आणि तयाचे वसते स्थान।
हे ज्याचे भासाभासमान। त्यासी प्रमाण कासया।।३२।।

**अर्थ -** प्रमाता म्हणजे प्रमाण देणारा, प्रमेय म्हणजे सिद्ध करावयाची वस्तू आणि प्रमाण म्हणजे त्यासाठी सादर केलेला पुरावा, अशी ही त्रिपुटीच ज्यावर आधारलेली आहे आणि ज्याच्यावर भासात्मक दिसत आहे त्या परमात्मवस्तूसाठी प्रमाणाची काय आवश्यकता ?

**भावार्थ -** जसे हातच्या कंकणाला आरशाची गरज नाही. हातातील कंकण आपल्या अनुभवाला येते. ते हातात आहे हे दाखविण्यासाठी आरशाच्या प्रमाणाची गरज नाही. त्याचप्रमाणे ज्यांना गुरुबोध प्राप्त आहे त्यांच्यासाठी **परब्रह्म वस्तु स्वसंवेद्य आत्मा** आहे. त्यासाठी बाहेरच्या प्रमाणांची गरज नाही.

३३) वृत्ति होता विषयाऐशी। जीव तयाते प्रकाशी।
स्वप्रकाशे जाणे तिहींशी। अर्थ तोचि परमात्मा।।३३।।

**अर्थ -** वृत्ती म्हणजे ज्ञानेंद्रियांची विषय आत घेण्याची क्षमता. जीवाच्या इच्छेसाठी ती प्रकाशात येते. परंतु वृत्ती, विषय आणि जीव या तिहींना जो स्वप्रकाशात जाणतो तो परमात्मा आहे.

**भावार्थ -** पंच ज्ञानेंद्रिये पंच विषय आत घेत असतात. जसे चक्षूच्या दृष्टीने रूप विषय आत घेतला जातो. चक्षू ऐकू शकत नाही. कान पाहू शकत नाही. प्रत्येकाचा त्याचा असा विषय आहे आणि तोच फक्त आत घेण्याची क्षमता त्या त्या ज्ञानेंद्रियाची आहे. जीवाच्या जाणीवेच्या प्रकाशात तो तो विषय आत घेतला जातो. इंद्रियांची विषय आत घेण्याची किंवा बाहेर सोडण्याची क्षमता ज्या चैतन्यशक्तीमुळे आहे तो परमात्मा आहे.

पान नं. १० वर

# गोजिरवाणी... ✍

- सौ. नीता कुलकर्णी

**आजी** - मी आज तुम्हाला एकनाथ महाराजांच्या शिष्याची एक गोष्ट सांगणार आहे.
**मुले** - सांग आजी.
**आजी** - अरे गावबा नावाचा एक अर्धवट मुलगा नाथांचा शिष्य होता. लहानपणापासून तो खूप खादाड होता व उनाडही होता. त्याला पुरणपोळी खायला खूप आवडत असे.
**मुले** - हो आजी ?
**आजी** - अरे हो, परंतु त्याच्या घरची परिस्थिती बेताची असल्याने त्याच्या आईला याचा त्रास होई. शेवटी वैतागून एक दिवस तिने या मुलाला नाथांकडे आणून सोडले व गावबाचा संभाळ करायची विनंती केली.
**मुले** - मग ?
**आजी** - नाथांनी त्यास ठेवून घेतले. गावबालाही हवे तसे जेवण मिळू लागले. नाथ त्याला शिकविण्याचा खूप प्रयत्न करीत, पण त्याला काहीच धड उच्चारता येत नव्हते. शेवटी कसेबसे तो 'एकनाथ' ही चार अक्षरे म्हणू लागला. नाथांनी त्याला एवढ्या चार अक्षरांचाच जप करायला सांगितले. पुढे तो 'एकनाथ' या नावाचा जप करू लागला व नाथांचे पुराण श्रवणही नित्य करू लागला. पण त्याची मजल तिथवरच होती. तो जवळजवळ पंधरा वर्षे नाथांकडे राहिला. नाथांच्या शेवटच्या काळात नाथ 'भावार्थ रामायण' ओवीबद्ध करीत होते. बेचाळीस अध्यायांचे निरूपण नाथांकडून झाले. परंतु त्यानंतर नाथांनी आपला निर्वाणाचा दिवस जाहीर केला.
**मुले** - मग त्यांचे अर्धवट राहिलेले रामायण ?
**आजी** - हो, अरे नाथांनी आपले कर्तव्य संपत आल्याचे सांगितल्याने सर्व लोक दु:खी झाले होतेच. त्यात 'भावार्थ रामायण' कोण पूर्ण करणार ? असा प्रश्न सर्वांनाच पडला. मग नाथ म्हणाले,''अपुरे राहिलेले हे भावार्थ रामायण आता गावबा पूर्ण करेल.''
**मुले** - बापरे ! तो कसा काय करू शकणार ?

**आजी** - असेच सर्वांना वाटले. कारण गावबा वेडसर आहे व त्याला 'एकनाथ' ही चारच अक्षरे म्हणता येतात हे सर्वांनाच ठाऊक होते. परंतु नाथांनी आपण ज्या स्थानावर काव्य लिहिले तेथे गावबाला बसवले. त्याला काहीच माहित नव्हते. त्याने नाथांच्या आज्ञेचे पालन केले.

**मुले** - मग पुढे काय झाले ?

**आजी** - चमत्कार झाला. गावबा रामायण ओवीबद्ध करू लागला. त्याच्या मुखातून ओव्या बाहेर पडत होत्या. त्याने रामायणावर निरूपण करण्यासही सुरुवात केली.

**मुले** - असे कसे काय आजी ?

**आजी** - अरे, गावबाची एकनाथांवर खूप भक्ती होती. त्याचा भाव अत्यंत शुद्ध होता. तसेच निरंहकारी होऊन तो आपल्या गुरुंच्या आज्ञेचे पालन करीत होता. म्हणूनच हे सर्व त्याच्या हातून घडले.

**मुले** - खरंच आजी श्रद्धेचे फळ किती मोठे असते ना!

**आजी** - बाकीच्यांना जरी तो वेडसर वाटत होता तरी चार अक्षरी 'एकनाथ' हे नाम घेऊन त्याने किती मोठी मजल मारली आहे हे फक्त नाथानांच माहित होते.

■■■

## उत्सव विशेष...

### श्री. स. स. दत्तमहाराज पुण्यतिथी उत्सव २०१४

### कार्तिक शु. ८ ते कृ. १ शके १९३६ दि. ३० ऑक्टो. ते ९ नोव्हें. २०१४

**मूळपद**

सद्‌गुरूसेवा खूण सांगतो लक्ष देऊनी ऐका।
हीच सेवा मुक्तिदायक घेई अभय भाका।।धृ.।।
वाचामृत धरी बा नित्य सम राव रंका।।
आपपर भेद मिथ्या जाणूनी पिटी ऐक्य डंका।।१।।
आत्मशांति सद्‌गुरूभक्ती अन्य साधने टाका।
भक्तवत्सल सद्‌गुरु जाणुनी मोक्ष वरा नीका।।२।।
सर्व ठिकाणी दत्त भरला मारी वेद हाका।
धरूनी हृदयी खूण ही भजे नित्य अकलंका।।३।।

# तरुणाई... ✍

**- रघुनंदन**

## स्वतंत्रते भगवती...

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर!!! एक झंझावात! एक वादळ! एक ज्वालामुखी! एक स्वातंत्र्य ध्येयाने पेटून उठलेला ज्वालामुखी! एक वादळ, असे जे सगळ्या जनसमुहाला आपल्या वेगाने, एकाच दिशेने ओढून नेणारे! एक युद्ध! असे युद्ध ज्यात विजयाचा आनंद आहे पण प्राण गमवले तर ते एखाद्या महायज्ञात आहुती देण्यापेक्षा कमी नाही!

वीर सावकर हे नाव घेतल्यावर अंगावर चऽर्रकन् काटा येतो व काळजाला भेदून थेट स्वातंत्र्ययुद्धाच्या रक्ताच्या थेंबाची आठवण करून देतो.

२८ मे १८८३ हा त्यांचा जन्मदिवस! लहानपणी आईवडीलांचे छत्र उडाल्यावर मातृभूमी हेच आपले छत्र मानणारा एक राष्ट्रयोद्धा!

वीर सावरकर म्हणजे त्यागाचे ज्वलंत उदाहरण! ब्रिटनमध्ये बॅरिस्टर पदवी मिळवूनही वकिली करण्यास सरकारने त्यांच्यावर बंदी आणली. परंतु त्यांनी तेथे राहूनही 'इंडिया हाऊस' मध्ये फक्त मातृभूमीच्या सेवेच्या कार्याचाच विचार केला. साक्षात् सागरालाही लाजवेल असा अनंत ध्येयसागर! फक्त मातृभूमीची सेवा हेच ध्येय!

अकरा वर्षे अंदमान सारख्या काळ्या पाण्याच्या नरकात राहूनही फक्त स्वातंत्र्याचाच विचार! अंदमानमध्ये एखाद्या जनावरालाही वागणूक मिळणार नाही अशी वागणूक मिळत असूनही त्यांचे ध्येय फक्त स्वातंत्र्यच! ज्याप्रमाणे भगवान शंकरांनी जटेमध्ये गंगा धारण केली त्याप्रमाणे स्वातंत्र्याच्या अनंत गंगेचा विचार धारण करणारा हा स्वातंत्र्य लढ्यातील एक योगी! पुरेशी जागा नसून व कागद लेखणीची परवानगी न मिळाल्यामुळे भिंतीवर काट्याकुट्यांनी महाकाव्याच्या काही ओळी लिहायच्या. त्या पाठ करून पुन्हा त्याच भिंतीवर पुढच्या ओळी लिहायच्या. अशाप्रकारे अंदमानच्या अंधाऱ्या कोठडीलाही आपल्या प्रतिभेच्या तेजाने झळाळून टाकणारा एक महाकवी!

पुढे मग रत्नागिरीच्या कारागृहात जन्माला आला हिंदुत्वाचा सूर्य! हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व हे जगाला सांगणारा एक विचार! सावरकारांसाठी हिंदुत्व म्हणजे आपल्या

मातृभूमीलाच तीर्थक्षेत्र मानणारा धर्म! सगळ्या जाती-जमातींना एकत्र करणारा हिंदुत्वाचा विचार! आपण सर्वजण एक आहोत व आपण आपल्या मातृभूमीची काळजी घेतली पाहिजे हा ज्वलंत विचार!

वीर सावरकरांना जे काही भोगावे लागले व त्यातून त्यांना जो बोध झाला, तोच आम्हाला गुरुदेवांनी दिला आहे. आपण देह नाही व देहापासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आपण आपल्या आत सावरकरांना व हिंदुत्वाला जागृत केले पाहिजे. ज्याप्रमाणे अंदमानमध्ये सावरकरांच्या अंगाची लाही लाही होत होती, पण मनात फक्त स्वातंत्र्याचा विचार होता, त्याप्रमाणे आपल्याला कठीण प्रसंगातही 'देह मी' या सुंकचित भावातूनच मुक्त होण्याची जाणीव झाली पाहिजे. जसे सावरकरांनी अंदमानच्या अंधाऱ्या कोठडीलाही आत्मप्रकाशाने झळाळून टाकले तसे आपणही आपल्या देहाच्या कोठडीला आत्मप्रकाशाने तेजोमय केले पाहिजे.

जसे हिंदुत्व हेच राष्ट्राच्या कल्याणाचे साधन तसेच 'परब्रह्म मी' ची जाणीव हेच आपल्या जीवनाच्या कल्याणाचे साधन!

जर आपण हे साध्य करू शकलो तर सावरकरांप्रमाणे राष्ट्राचे नाही पण देहाचे स्वातंत्र्यवीर मात्र नक्कीच होऊ! मग मात्र 'अवघे विश्वचि माझे घर' ही ज्ञानेश्वरांची वचनोक्ती अनुभवता येईल! ■■■

---

पान नं. ६ वरून

३४) स्वरूपी असो वृत्तिव्याप्ति। परी काज नसे जीवाप्रति।
चिदात्मा स्वप्रकाश संवित्ति। सहज सिद्ध असता।।३४।।

**अर्थ -** जीव चैतन्याचे जाणीवेच्या प्रकाशात सर्व व्यवहार चालू असतात. म्हणून त्याला स्वरूपाला जाणण्याचे कारण भासत नाही. जीवच चैतन्यरूप असल्याने तो ज्ञानरूप व स्वयंप्रकाश आहे हे सहज सिद्ध आहे. (जीवोब्रह्मैव ना परः।)

**भावार्थ -** जीव चैतन्याचे सर्व व्यवहार म्हणजे दशेंद्रियांची ग्रहण व दान ही कर्मे जाणीवेच्या प्रकाशात अविरत चालू असतात. ज्याप्रमाणे सूर्याला पाहण्यासाठी वेगळा दिवा लागत नाही. तसे स्वरूपाला वेगळे जाणणे राहत नाही. कारण इतरांना जाणण्यासाठी वृत्ती प्रकाश लागतो. परंतु स्वरूपाला जाणण्यासाठी निघालेला स्वरूपरूपच आहे, हा अनुभव आहे म्हणून जीवचैतन्य वेगळे नसून, त्याची स्वयंप्रकाशता व ज्ञानरूपता सहज सिद्ध आहे. ■■■

# शब्द तेच छेडिता... ✍

**- अदिती**

जाने क्या तूने कही जाने क्या मैने सुनी
बात कुछ बन ही गई।।

गणेश जयंतीचा तीन दिवसांचा उत्सव संपला. घरी परत येताना पावलं जड झाली होती. गुरुदेवांनी साक्षात् गणेश घडवला होता. आपण गणेश आहोत असा पुसटसा विचारसुद्धा कधी आला नव्हता. रस्त्यात बराच ट्रॅफिक जॅम होता. महाराजांनी आयुष्याची गती इतकी संथ केली की त्याचे काही वाटले नाही. ठीक आहे पोहोचणारच आहोत ना घरी! बाजूच्या गाडीतून गाण्याचे सूर आले,''जाने क्या तूने कही। जाने क्या मैंने सुनी। बात कुछ बन ही गई।'' ती गाडी पुढे निघून गेली. पण गाणे आमच्यासाठी सोडून गेली. मन विचार करीत राहिलं. 'खरंच अशी कुठली गोष्ट गुरुदेवांनी सांगितली होती आणि आम्ही ती ऐकली होती की 'बात कुछ बन ही गई' ती कोणालाही सांगता येणार नाही की दाखवता येणार नाही. जे त्यावेळी तिथे होते तेच अनुभव आठवू शकतील.

पहाटे साडेपाचच्या पोथीची सुरुवात! आपण प्रपंचातून गेलेलो असतो त्यामुळे 'थरथराहटसी' होतेच. फळ्यावर काहीच नव्हते, तेव्हा मी एकलाच सद्‌गुरू निराकार निर्विकल्प होतो. मग 'मी आहे' असा थेंबुटा उठला आणि त्याचा ओघळ स्वरूपावरून खालच्या दिशेने निघाला. ते स्वतःचं विशाल रूप पाहताना खरंच,

'सनसनाहटसी हुई थरथराहटसी हुई,
जाग उठे ख्वाब कई, बात कुछ बन ही गई'

बिंदूने आपली जागा सोडली आणि तो खाली ओघळला. तिथूनच त्याचं आनंदस्वरूप कमी व्हायला सुरुवात झाली. तरीही सुरुवातीला जी सूक्ष्म पंचभूते निर्माण झाली, ती शुद्ध सत्त्वातली होती. पण पुढे त्रिगुण झाले आणि त्यांचही रूप पालटलं मग सगळा गुंता तर झालाच पण पुढे तो वाढतच गेला. एकूण निष्कर्ष काय तर आपण सुखरूप होतो ते दुःखरूप झालो. पण तरीही काही भाग्यवान ठरले. ज्यांना सगुण सद्‌गुरुंकडून महामंत्र आणि बोध मिळाला. त्यांनी उलटे पहायला चालू केले. गुरुदेवांची पंचज्ञानेंद्रिये आपली कार्ये शिष्याच्यासाठी अदलाबदली करतात आणि त्याला

अधिष्ठानावर बसवतात ‘ गुरुदेवांच्या कानांनी तुम्हाला काय दिले ?’ असा प्रश्न गुरुदेवांनी विचारला होता. त्याचे उत्तर कोणालाच सांगता आले नाही. वास्तविक श्रोत्रेंद्रिय हे शब्द, नाद आत घेण्याचे कार्य करतात. ते देत काय असणार ? तिथेच गुरूदेवांनी आमचे अहंकार मुंडके छाटून टाकले. गुरुदेवांच्या मस्तकातून ज्ञानगंगा वाहते, त्यांचा प्रत्येक अवयव ही शिष्याची ‘सोऽहं’ जाणीव जागृत करण्यासाठी फक्त देण्याचे कार्य करत असतो. मग शिष्याचे पूर्वीचे वागणे, पूर्वीची चाल पार बदलून जाते आणि आम्ही ‘सद्‌गुरुचे गुंड’ याप्रमाणे (रूबाबदार) प्रत्येक पाऊल आत्मविश्वासाचे पडते. गुरुदेवांनी जन्मलेल्या लहान बाळाचं उदाहरण दिले होतं. २-३ दिवसांच्या बाळाचे डोळे उघडे असतात. इकडे तिकडे त्याची नजर भिरभिरत असते (ती स्थिर झालेली नसते.) म्हणून ते इकडे तिकडे बघते आहे असे आपल्याला वाटते. पण प्रत्यक्षात त्याला काहीच दिसत नसते. आम्हालाही खरे म्हटले तर काहीच दिसत नसते, म्हणजे जे दिसायला हवे ते दिसतच नसते. आपल्याला वाटते की माझी तर दृष्टी चांगली आहे. आत्मविश्वास नसल्यामुळे आपण ताठपणे बघायचं पण टाळतो. पण गुरुदेवांच्या सान्निध्यात तसे होत नाही.

‘नैन झुकझुकके उठे, पाँव रूकरूकके उठे,
आ गई चाल नयी, बात कुछ बन ही गई’’

पोथीतल्या सूक्ष्म अभ्यासाबरोबरच कथेतली पौराणिक कथा, पार्वतीने तिच्या मळाचा गणपती बनवला आणि त्याच्यामध्ये प्राण घातला. शिवाने त्याचे मुंडके उडवले आणि पार्वतीने रणचंडीचा अवतार धारण केल्यावर त्याला हत्तीचे गजमुख जोडले. वर्षानुवर्षे ही गोष्ट काय असेल याचा आपण कधीच सूक्ष्म विचार करून शोध लावायचा प्रयत्न केला नाही. जी आहे ती तशीच स्विकारत पुढच्या पिढीला देत गेलो आणि पूर्वी जाणत्यांनी अशा पौराणिक गोष्टी का बनवल्या असतील याचा विशेष उहापोह करण्याचाही प्रयत्न केला नाही. पण डोळ्यांवर आलेली झुल्फे महाराजांनी उडवली. पहिल्या दोन दिवसात आमच्यातल्या अहंकाराचे मुंडके छाटले होते ते तिसऱ्या दिवशीच्या कथेतच ‘गजमुख’ म्हणजे पराबुद्धिचे जोडले.

‘‘झुल्फ शान पे मुडे, एक खूशबूसी उडी
खुल गए राज कई, बात कुछ बन ही गई’’

# अहो ऐकलंत का... ✍

**- मुग्धा**

## शुभमंगल

काय दचकलात? 'पाझर' मध्ये शुभमंगल? अहो, पण हे आहे शंकर पार्वतीचं शुभमंगल! बरोबर! महाशिवरात्र! त्याचेच वर्णन आहे हे!

दि. २५ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी २०१४ दरम्यान बोरिवलीला महाशिवरात्री उत्सव पार पडला. पण यावेळेस महाराजांनी जरा वेगळ्याच ढंगाने निरूपण केले. म्हणजेच हाही लग्नसोहळा पारंपारिक लग्नाप्रमाणे तीन दिवस चालला. सुरुवात झाली ती २५ तारखेला सकाळी देवक बसवून! सकाळी १० वाजता अष्टविनायक दर्शनाच्या कथेने देवक बसविले गेले. त्याआधी पहाटेच्या पोथीत 'श्री गणेशाय नमः' या मंत्राच्या प्रत्येक अक्षराचा अंतर्गत अर्थ सांगितला गेला. देवक बसवण्याच्या आधीची पूर्वतयारीच ती! नंतर मात्र खऱ्या अर्थी लग्नसोहळ्याला सुरुवात झाली. संध्याकाळी कथेमध्ये हळदीचा कार्यक्रम झाला. हे लग्न होते गुरु-शिष्याचे, पिंड-ब्रह्मांडाचे व बुद्धी-आत्म्याचे! हळद आतून लागली की त्याचे पडसाद वरही दिसू लागतात. त्याप्रमाणे कथेच्या शेवटी खरं तर सर्व गुरुभक्त रंगलेले होतेच. त्याचे प्रतिक म्हणून सर्वांना वरून हळदीने रंगविण्यात आले.

सगळे काही आनंदातूनच निर्माण झाले आहे. तेव्हा लग्नकार्याची सुरुवात ही हळद खेळून म्हणजेच देहभान सोडून आनंदातूनच व्हायला हवी हाच त्यामागचा अर्थ! 'पिवळी पिवळी हळद लागली, भरला हिरवा चूडा' असे वधूस म्हटले जाते. तसेच माऊलीही सर्व भक्तांना आतून बाहेरून रंगवित होती. लग्नाच्या मंडपात असावे तसेच वातावरण होते. सर्व गुरुभक्त तीनही दिवस कार्याला आल्याप्रमाणे नटूनथटून आले होते.

दुसरा दिवस हा सीमान्त पूजनाचा! ० ते ९ हे आकडे जरी वरवर हिशोबासाठी वापरले जातात, तरी माऊलीने मात्र सकाळच्या पोथीत त्यातून प्रबोधाची मांडणी केली. जसे सीमान्तीच्या रात्री करमणुकीचे कार्यक्रम म्हणजेच 'संगीत' किंवा एखादी गाण्याची मैफल ठेवली जाते, तसेच दुपारी 'जय जय गौरी शंकर' हे नाटक वठवले गेले. त्यानंतर म्हणजे संध्याकाळच्या कथेत 'सीमान्त पूजन', 'विहीणीची पंगत,

पान नं. १६ वर

# आठवणीतल्या माई... ✍

**- दीपक फडे**

गुरुपौर्णिमेच्या दिवशी मंदिरात गेलो होतो. नेहमीप्रमाणे हातपाय धुतले आणि पाणी पिण्यासाठी स्वयंपाकघरात गेलो. स्वयंपाकघरात माईचं काही तरी चालू असावं असं डोक्यात होतं. पण तिथे लताताई दिसली. थोडे थबकलोच. अरे, आपल्यात आता माई नाहीत याची जाणीव झाली. वाटलं, माईंनी सांगावं, 'अरे आता आला आहेस तर थोडी मदत कर. थोडी भाजी हलवून दे, गॅसवरचं भाताचं भांडं खाली काढ. डब्यातून तेल काढून दे.' आज त्यांची हाक नव्हती, ती जागा आता लताताईंने घेतली.

मला आठवतं, बोध झाल्यावर जेव्हा माईंना पहिल्यांदा पाहिलं तेव्हा घाबरायला झालं. त्यांची नऊवार पातळ घातलेली सावळी मूर्ती, डोळ्यावर चष्मा, आवाजात जरब, बोलणं मोजकच परंतू काळजाला भिडणारं असं व्यक्तिमत्त्व डोळ्यापुढे आलं. त्या अत्यंत शिस्तप्रिय होत्या. गुरुभक्त मंदिरात वागताना जर चुकत असेल तर त्याला कडक शब्दात बोलत. परंतू नंतर समजूनही सांगत. मंदिरात आलेल्या प्रत्येक गुरुभक्ताची त्या जातीने काळजीही घेत. आलेल्यांची विचारपूस करणे, काय हवं ते त्याला देणे हे सर्व त्या करीत. त्यांचा सर्वांना धाक होता पण तेवढेच प्रेमही होते. त्या मंदिरात नसल्यावर प्रत्येकालाच चुकल्यासारखे वाटत असे.

सुरुवातीच्या काळात मंदिरात दीपकचे राहणे जास्त होते. माईंच्या स्वभावाची ओळख पटली. त्यांच्याबरोबर एकदा सुरतला एका गुरुभक्ताकडे जाणं झालं. प्रवासात गप्पा झाल्या, ज्ञानातले दोन शब्द त्यांनी सांगितले. ज्या गुरुभक्तांकडे आम्ही गेलो होतो त्यांच्याशी त्यांनी आपल्या नातवाप्रमाणे ओळख करून दिली. तेव्हापासून त्यांच्याशी वेगळच नातं निर्माण झाले.

खूप दिवसांनी मंदिरात जाणं झालं की त्यांची नेहमीची वाक्यं असत,'काय आज गाडी चुकली वाटतं!' मी सुद्धा कबुली देत असे, 'नाही हो माई, मंदिरात यावसं वाटतं, पण काय...' त्या म्हणत, 'असू दे. मला माहित आहे. तुला महाराजांना

भेटायचं असेल ना? जावून ये. नंतर चहा ठेवते.'' किंवा 'आता ऑफिसमधून आला आहेस तर चहा घे.' नंतर त्यांचा सूर लगेच बदललेला असे,''काय वाचन चाललं आहे?'' असे विचारल्यावर घरातल्यांची विचारपूस करणार. पण आपण मात्र त्यांच्या तब्येतीची चौकशी केली की म्हणणार,'अरे मला काय धाड भरली?'' त्यांच्या तब्येतीची तक्रार माईंनी कधीच केली नाही. त्यांना ते आवडत नसे. हृदयाची बायपास सर्जरी झाली तरी त्यांची मंदिरातील कामे कधीच थांबली नाहीत.

हक्काचं घर असूनही त्यांनी मंदिर कधी सोडलं नाही. त्यांचा मुक्काम मंदिरात असे किंवा मंदिर हेच त्यांचे घर होते. त्यांची मंदिरातील दिनचर्या ठरलेली असे. त्यात कधीच बदल झालेला आढळला नाही. सकाळी उठलं की आधी काकड आरती, त्यानंतर चहा. मंदिरात पोथी असल्यास ती ऐकणं, नंतर आंघोळ आणि तोंडाने अभिषेक म्हणणे चालू असे. त्यांचा आवाज कधी दुसऱ्याला ऐकू येत नसे. त्या भजनही म्हणत, परंतु ते स्वतः पुरते मर्यादित असे. त्यांच्याजवळ ज्ञानाचा साठा मोठा होता, पण त्याचा गवगवा नव्हता. त्यांच्याकडून शिकण्यासारखे खूप होते.

मंदिरात पोथी चालू असली की महाराजांनी प्रश्न विचारला आणि कोणालाच त्याचं उत्तर देता आलं नाही की महाराज माईंना विचारत, 'सांगा हो माई!' आणि माईंच्या उत्तराने हशा पिकत असे. हे नेहमीचेच!

स्वयंपाक करण्यात माई अगदी सुगरण होत्या. अन्नपूर्णाच त्या! उत्सवातला त्यांचा स्वयंपाक भक्तांना बोटे चाटायला भाग पाडी. एवढ्या सगळ्यांचा स्वयंपाक सुरूवातीला तर त्या एकट्याच करीत असत. लुडबूड केलेली त्यांना आवडत नव्हती. प्रश्न पडायचा त्या थकत कशा नव्हत्या? ह्याचाच अर्थ त्या कधी 'देह मी' या भावावर नसायच्या. मंदिरातल्या वाटचालीत त्यांचा खूप मोठा वाटा होता. श्रीसद्‌गुरु स्वयंभू महाराज असतात असे असले तरी सद्‌गुरुंशी आमची गाठ पडली याचे श्रेय नक्कीच माईंना जातं.

माईंनी देह ठेवून वर्ष होऊन गेले. परंतु अशा आम्हा साऱ्या गुरुभक्तांच्या माईंना विसरणं कदापी शक्य नाही.

■■■

पान नं. १३ वरून
‘व्याही भेट’ वर्णन केले. देहाच्या सीमा ओलांडणे हेच खरे सीमान्त पूजन! सर्व विधींचे अंतर्गत अर्थ ऐकून सर्वच गुरुभक्त अवाक् झाले.

तिसरा दिवस म्हणजेच लग्नाचा दिवस! सकाळच्या पोथीत श्रीसस भागीरथीआईंच्या कार्याची ओळख करून देत माऊलीने सर्वांना आपणही समाजाचे देणे लागतो याची जाणीव करून दिली. ८०-९० वर्षांपूर्वीच्या काळात एका अनपढ स्त्रीने कुठेही वाच्यता न करता स्त्रियांसाठी केलेले कार्य ऐकून सर्वजण चकित झाले. जणू वधूची भूमिका महाराज घट्ट करवून घेत होते. दुपारच्या वेळी सर्व गुरुभक्तांच्या आग्रहास्तव महाराजांनी स्वत: श्रीशंकराची भूमिका साकारली व ‘जय जय गौरी शंकर’ हे नाटक परत एकदा वेगळ्या कलाकारांच्या सोबतीने सादर केले. सर्वच गुरुभक्तांना कैलासावर जाण्याचा प्रत्यय आला. संध्याकाळच्या कथेत लग्नसोहळा पार पडला. ‘लाजाहोम’, ‘सप्तपदी’, ‘कन्यादान’, ‘सुनमुख’, ‘लक्ष्मीपूजन’ अशा सर्व विधींचे महत्त्व आम्हाला आजकाल वाटतच नाही. परंतु महाराजांच्या निरूपणाने लग्न-विधींचे महत्त्व सर्वांनाच कळाले. विधींचे महत्त्व सांगतानाच बुक्क्याच्या वेळी महाराजांनी ‘अर्धनारीनटेश्वरा’चे दर्शनही घडवले. ज्ञानाची सप्तपदी चालत चालतच प्रेमभक्तीचे पुढचे पाऊलही टाकायला महाराजांनी शिकविले. लग्नसोहळ्यात गुरुभक्तांच्या उखाण्यांचा कार्यक्रमही पार पाडला.

जसे नववधूने माहेर मागे टाकून सासरी नांदावे, सर्वांना प्रेमाने बांधून घ्यावे, तरच संसाराचा आनंद खऱ्या अर्थी लुटता येतो. तसेच आपणही महाराजांनी घालून दिलेल्या मार्गावरून जात असताना परत मायेच्या तडाख्याला बळी न पडता आनंदाने रहावे म्हणूनच असे उत्सव महाराज करीत असतात. आपणही ‘शुभमंगल सावधान’ असे म्हणताना ‘मी’च्या अवाधानासहीत असावे. मगच ‘लागो न दृष्ट माझी माझ्याच वैभवाला’ असे होऊन जाईल. ■■■

‘सामान्य स्वरूप’ समुद्र, ‘मायोपाधी ईश्वर’ ही लाट, ‘अविद्योपाधी जीव’ हा बुडबुडा आहे. बुडबुडा सागरात मिळतो तसे जीवाने सामान्य स्वरूपात मिळावयाचे. ‘संकल्प-विकल्प’ सोडा. बुद्धीला परमार्थाकडे वळवा. अखंड नामस्मरण करा, तरच आनंदातून आलेला जीव पुन्हा आनंदात मिळेल.

**- श्रीसस भागीरथीनाथ**

# रुचि रुचि भोजन

यशोदे घराकडे चाल। मला जेवू घाल।।धृ।।
साध्या गव्हाची पोळी लाटी। मला पुरणपोळी करून दे मोठी।
नाही अडवीत गुळासाठी। मला जेवू घाल।।१।।
तूप लावून भाकर करी। वांगे भाजून भरीत करी।
वर कांद्याची कोशिंबिरी। मला जेवू घाल।।२।।
आई गं खडीसाखरेचे खडे। लवकर मला करून दे वडे।
बाळ स्फुंदस्फुंदोनी रडे। मला जेवू घाल।।३।।
आई लहानच घे गे उंडा। लवकर भाजून दे मांडा।
लांब गेल्या गाईच्या झुंडा। मला जेवू घाल।।४।।
आई मी खाईन शिळ घांटा। दह्याचा करून दे मट्ठा।
नाही माझ्या अंगी ताठा। मला जेवू घाल।।५।।
भाकर बरीच गोड झाली। भक्षुनी भूक हारपली।
यशोदेने कृपा केली। मला जेवू घाल।।६।।
आई मी तुझा एकुलता एक। गाई राखितो नऊ लाख।
गाई राखून झिजली नख। मला जेवू घाल।।७।।
नामा विनवी केशवासी। गाई राखितो वनासी।
जाऊन सांगा यशोदेसी। मला जेवू घाल।।८।।

■■■

## गुंजारव - १ — - सौ. प्रतिभा गोखले

माधुरी माधुरी बोले वैखरी। माझ्या तुझ्याची खुंटली बोली।।
माधुरी माधुरी मध्यमें गुणगुण। मन बुद्धी झाली तल्लीन।।
माधुरी माधुरी पश्यंति नाद। हृदयी दाटे परमानंद।।
माधुरी माधुरी परा घोष। सच्चिदानंद मी स्वयंप्रकाश।।
प्रतिभा माधुरी नाम कवच। सद्‌गुरु माधुर्य अनिर्वाच्य।।

# पाझर अमृताचा

BOOK-POST

To,

## संस्थेतील प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्त महाराज जयंती उत्सव**
पौष कृ. प्रतिपदा २१ डिसें. ते ७ जाने.२०१५

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३ दि. १५ फेब्रु. ते १७ फेब्रु.२०१५

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५
दि. ०३ मार्च ते १२ मार्च २०१५

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १३ दि. २८ एप्रिल मे ते ०५ मे २०१५

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५ दि. २३ जुलै ते १ ऑगस्ट २०१५

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४
दि. २० ऑगस्ट ते २८ ऑगस्ट २०१५

**श्री स.स. दत्त महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. १८ नोव्हें. ते २७ नोव्हें २०१५

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्रीहनुमान जयंती** | - चैत्र पौर्णिमा |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व. १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ. १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व.१ ते ९ |
| **अधिक महिना** | - १७ जून ते १६ जुलै |

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

'पाझर'ची दहा वर्षे सरली असून अकराव्या वर्षात पदार्पण झाले आहे. 'पाझर'च्या वाचकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करीत आहोत. ज्यायोगे वाचकांच्या प्रतिक्रिया अजमावून अंकाची सुधारणा करण्यात येईल. ज्या **वाचकांनी हा फॉर्म भरून पाठविला नसेल** त्यांनी कृपया तो भरून मंदिराच्या पत्त्यावर पोस्टाने पाठवावा **(कुरियरने पाठवू नये).** आपल्या प्रतिक्रिया हेच आमचे मानधन!

वाचकाचे संपूर्ण नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

______________________

(कृपया एकाच पत्त्याचा तपशील द्यावा.)

नित्यसाधनेसाठी आपण कोणत्या केंद्राशी जोडलेले आहात ? (उदा. सद्‌गुरु आश्रम-नरसिंगड, बलभीम मंदिर-साडेगाव, भागीरथी गुरुमंदिर ट्रस्ट-अमरावती, बलभीम भवन-इंदौर, घोलप आजींचे घर - नागपूर...... अशा प्रकारे केंद्राचे नाव लिहावे.)

______________________

कोणकोणत्या उत्सवात सहभाग असतो ?

______________________

आपल्याला अनुग्रह दिलेल्या सद्‌गुरुंचे नाव :

______________________

द्वैमासिक नियमित मिळते का ? हो / नाही

नियमित वाचन होते का ? हो / नाही

आपण ‘पाझर’चे वाचन वेबसाईटवरून करता का? हो / नाही

गेल्या दहा वर्षातील आवडलेली सदरे : ____________________

____________________________________________

____________________________________________

चालू सदरांमधील आवडती सदरे : ____________________

____________________________________________

____________________________________________

काही सूचना / अपेक्षित बदल : ____________________

____________________________________________

____________________________________________

आपली प्रतिक्रिया : ____________________

____________________________________________

____________________________________________

जागा अपुरी पडल्यास प्रतिक्रिया स्वतंत्र कागदावर लिहून फॉर्मसोबत पाठवावी. (वेबसाईटवरून वाचन करणाऱ्या वाचकांनी त्यांच्या प्रतिक्रिया ऑनलाईन कळवाव्या.)

**वरील फॉर्म भरून पाठविणाऱ्या वाचकासच पुढील ‘पाझर’ पाठविला जाईल. ज्यांचे फॉर्म आमच्यापर्यंत पोहोचणार नाहीत त्यांना ‘पाझर’ पाठविला जाणार नाही याची कृपया दखल घ्यावी.**